# गुरुमाई चिद्विलासानंद यांच्याद्वारे लिखित पुस्तक
# अंत:शुद्धीचे सोपान

## *उद्धरण २४*

सत्त्व-संशुद्धीचा जन्म होतो, शुद्ध कर्मांनी. कुठलाही चित्रपट 'निर्दोष' नसतो. 'साधे' जेवण असे काहीही नसते. प्रत्येक गोष्ट, अगदी बातम्यादेखील तुम्हाला खोलवर प्रभावित करतात. तुम्हाला अनेकदा हे जाणवले नाही का, की एखादी बातमी ऐकल्यावर कित्येक तासांनंतरदेखील, त्या बातमीच्या स्वरूपानुसार, तुम्ही दु:खी वा उत्साही होता? बातमी तर बातमीच असते. चांगली असो वा वाईट; तिचा तुमच्यावर परिणाम होतो. तुम्ही तुमच्या कानांमध्ये जे काही भरता, ते तुमच्या आतमध्ये राहते.

फार कमी लोक आहेत, जे अशा गोष्टींचे लगेचच विश्लेषण करून त्या मनातून काढून टाकू शकतात. बाहेरचे प्रभाव ग्रहण करण्यासाठी किंवा आत्मसात करण्यासाठी तुम्ही अत्यंत अनुशासित असणे आवश्यक आहे, तसेच त्याचे त्वरित विश्लेषण करून लवकरात लवकर आपल्यामधून ते बाहेर काढून टाकणे अतिशय आवश्यक आहे जेणेकरून यातील काहीही तुमच्या आतमध्ये राहणार नाही. जर तुम्ही चिखलाने भरलेल्या तळ्यात आंघोळ करण्याचा प्रयत्न केलात, तर स्वच्छ होण्याऐवजी मलिन होण्याची शक्यताच जास्त असते. तुम्ही दलदलीत बुडूही शकता. याच प्रकारे, तुम्ही जर बेपर्वाईने अशुद्ध कर्मे केलीत, तर आज ना उद्या त्यांच्या परिणामांखाली दबून जाल.

शैवमताचा एक मूलभूत ग्रंथ, 'स्पन्दकारिका' यामध्ये म्हटले आहे :

> *निजाशुद्ध्यांसमर्थस्य कर्तव्येष्वभिलाषिण:।*
> *यदा क्षोभ: प्रलीयेत तदा स्यात्परमं पदम्॥*
>
> एखादी व्यक्ती स्वत:च्याच अशुद्धीमुळे असमर्थ होते आणि
> कर्मांमध्ये आसक्त होते. [१:९]

© २०२२ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.

गुरुमाई चिद्विलासानंद, *अंत:शुद्धीचे सोपान : दिव्य सद्‌गुणांचा योग,* अध्याय २ 'अस्तित्वाची शुद्धी,' यामधून उद्धृत [चित्शक्ती पब्लिकेशन्स, २०१३], पृ. २४-२५.